ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत.(श्री.संदीप रमेश माळी
तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत हिवरे कोरडा
तालुका पारनेर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२४८/२०२६/2294452
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र/ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/६५८/२०२२, दिनांक- ०३/०८/२०२२
२. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी नेमणूक आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१५६/२०२३ दिनांक- १७/०२/२०२३
३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ/सी.आर.४०/२०२३ दिनांक- १२/०९/२०२३
४. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ठ ७.१
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (2)
६. इकडील पत्र क्र .साप्रवि-२/ग्रापं-३/२५४/२०२४ अ.नगर दि.२०/०६/२०२४ (अंतिम कारणे दाखवा नोटीस)
७. गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/६६३/२०२४, दिनांक ०४/०७/२०२४ अन्वये श्री माळी यांनी सादर केलेला खुलासा दि.०१/०७/२०२४

श्री संदीप रमेश माळी, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत हिवरे कोरडा तालुका पारनेर यांनी ग्रामपंचायत कार्यालीयन कामी गैरवर्तन केले असलेने संदर्भ क्र.१ अन्वये त्यांना दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक ०२ नुसार श्री संदीप रमेश माळी तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत.चौकशी अहवालाचा निष्कर्ष गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| आरोप क्रमांक | आरोपांचे स्वरुप | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | श्री.संदीप रमेश माळी, ग्रामसेवक, हे पंचायत समिती पारनेर अंतर्गत ग्रामपंचायत-हिवरे कोरडा व गारगुंडी, ता.पारनेर येथे कार्यरत असुन सदर ठिकाणी अनाधिकृत गैरहजर असल्याने त्यांना बजाविणे कामी पाठविण्यात आलेल्या नोटीस श्री.माळी यांनी न स्विकारुन वरिष्ठांचे आदेशाचा अवमान केलेला आहे. | आरोप सिध्द होतो |
| २ | श्री.संदीप रमेश माळी, ग्रामसेवक, हे पंचायत समिती पारनेर अंतर्गत ग्रामपंचायत-हिवरे कोरडा व गारगुंडी, ता.पारनेर येथे कार्यरत असतांना श्री.माळी यांनी कोणत्याही प्रकारचा रजा अर्ज कार्यालयास सादर न करता परस्पर स्वत:चे अधिकारात गैरहजर राहिलेले असुन हजर रहाणे बाबत आदेशीत करण्यात येऊनही ते ग्रामपंचायतीच्या सजेवर हजर झालेले नसुन दि. २५/०५/२०२२ पासून आज अखेर अनधिकृतरित्या ग्रामपंचायतीचे कामकाजावर गैरहजर आहेत. | आरोप सिध्द होतो |
| ३ | श्री.संदीप रमेश माळी, ग्रामसेवक, हे पंचायत समिती पारनेर अंतर्गत ग्रामपंचायत-हिवरे कोरडा व गारगुंडी, ता.पारनेर येथे कार्यरत असतांना त्यांनी मासिक आढावा | आरोप सिध्द होतो |

| | | |
|---|---|---|
| | बैठकांना वारंवार गैरहजर राहिलेले आहेत. तसेच नोटीसांना उत्तर दिलेले नाही. | |
| ४ | श्री.संदीप रमेश माळी, ग्रामसेवक, हे पंचायत समिती पारनेर अंतर्गत ग्रामपंचायत-हिवरे कोरडा व गारगुंडी, ता.पारनेर येथे कार्यरत असुन प्रकरणी प्रिया सॉफटवेअर मध्ये वार्षिक लेखे भरलेले नाहीत. तसेच संविधानिक लेखा परीक्षण देखील करुन घेतलेले नाही. तसेच श्री.माळी यांनी अभिलेखे न दाखविल्याने त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही का करण्यात येऊ नये या बाबत नोटीस मिळुनही त्यांनी कोणत्याही प्रकारे सहकार्य करीत नाहीत. | आरोप सिध्द होतो |
| ५ | श्री.संदीप रमेश माळी, ग्रामसेवक हे पंचायत समिती पारनेर अंतर्गत ग्रामपंचायत-हिवरे कोरडा व गारगुंडी, ता.पारनेर येथे कार्यरत असतांना त्यांनी घरकुल प्रस्ताव पंचायत समितीस सादर केलेले नाहीत. | आरोप सिध्द होतो |
| ६ | श्री.संदीप रमेश माळी, ग्रामसेवक, हे पंचायत समिती पारनेर अंतर्गत ग्रामपंचायत-हिवरे कोरडा व गारगुंडी, ता.पारनेर येथे कार्यरत असतांना केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्राप्त अर्जांचे अनुशंगाने श्री.माळी यांनी वारंवार अर्ज फेटाळले आहेत किंवा विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. | आरोप सिध्द होतो |

वरीलप्रमाणे श्री संदीप रमेश माळी, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत हिवरे कोरडा तालुका पारनेर यांचे वर ठेवण्यात आलेले ०६ पैकी ०६ आरोप विभागीय चौकशी मध्ये सिध्द झालेले आहे. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शवून विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष पाहता श्री संदीप रमेश माळी यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे.

सबब, श्री संदीप रमेश माळी,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत हिवरे कोरडा,ता.पारनेर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (1) नुसार, सक्तीने सेवानिवृत्त का करणेत येऊ नये ?, याबाबतची नोटीस देण्यात आलेली होती. याबाबतचा नोटीसचा खुलासा संदर्भ क्र.७ नुसार सादर केलेला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन करण्यात आलेले असुन सदरचा खुलासा प्रशासकीय दृष्टया असमर्थनीय आहे. श्री संदीप रमेश माळी यांचे खुलाश्याचे अवलोकन करुन त्यांना या आदेशान्वये पुढील दोन वेतनवाढ कायम-स्वरुपी रोखणे. ------------ ही शिक्षा अंतिम करण्यात येत असुन या आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०३०८०६००४६ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 08-03-2026 16:27:38
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति:-

श्री.संदीप रमेश माळी, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत हिवरे कोरडा तालुका पारनेर

व्दारा व प्रत - गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर

२/- सदरचा आदेश संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.